(63)

(८)

जन- ५४.५००:७

# बृहन्मुंबई महानगरपालिका

सामान्य प्रशासन विभाग

## परिपत्रक

क्रमांक : एमओएम/ ३५११ दिनांक ०२.०६.२००४

विषय: महाराष्ट्र माहितीचा अधिकार, २००२.
संदर्भ: १)परिपत्रक क्र.एमओएम/२५४३ दि.२०.१२.०३
२)परिपत्रक क्र.एमओएम/२९६५ दि.२.४.०४
३)परिपत्रक क्र.एमओएम/३०८२ दि.२१.४.०४

संदर्भित परिपत्रकांनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेची आवश्यक माहिती जनतेस उपलब्ध करुन देण्यासाठी आवश्यकतेनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेने सार्वजनिक माहिती अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे. महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियमाच्या अनुषंगाने अंमलात आणावयाच्या कार्यपध्दतीची माहिती वेळोवेळी परिपत्रकान्वये देण्यात आलेली आहे.

२. सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३१ मधील कलम ७ अन्वये दिलेली तरतूद पाहता जी माहिती कलम ७ मध्ये नमूद केलेल्या कारणास्तव रोखून ठेवावयाची असेल अशा माहितीसाठी करण्यात आलेली विनंती सार्वजनिक माहिती अधिकाऱ्याने सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे गठीत केलेल्या खाली नमूद केलेल्या समितीपुढे तावडतोब विचारार्थ व निर्णयार्थ ठेवावयाची आहे.

| | | |
|---|---|---|
| अति.आयुक्त (प्रकल्प) | - | अध्यक्ष |
| अति.आयुक्त (शहर) | - | सदस्य |
| अति.आयुक्त (प.उ.) | - | सदस्य |
| अति.आयुक्त (पू.उ.) | - | सदस्य |

३. समितीकडून माहिती रोखून ठेवण्यास मान्यता मिळाल्यानंतर सार्वजनिक माहिती अधिकाऱ्याने 'समितीच्या मान्यतेने असा नकार देण्यात आला आहे' असे नमूद करुन अर्जदारास कळविणे आवश्यक आहे.

४. उपरोक्त सूचनांची सर्व सार्वजनिक माहिती अधिकाऱ्यांनी नोंद घेऊन पुढील कार्यवाही करावी.

| | | |
|---|---|---|
| सही/-१०.५.०४<br>प्रमुख कर्मचारी अधिकारी | सही/-१५.५.०४<br>उप आयुक्त (सा.प्र.)प्र. | सही/-१९.५.०४<br>अति.आयुक्त (पू.उ.) |

| | | | |
|---|---|---|---|
| सही/- २१.५.०४<br>अति.आयुक्त (प.उ.) | सही/- २५.५.०४<br>अति.आयुक्त (शहर) | सही/- २८.५.०४<br>अति.आयुक्त (प्रकल्प) | सही/-२९.५.०४<br>आयुक्त |

प्रत : ———————————————( जादा प्रतीसह) यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

आ अ टेके

रचना व कार्यपध्दती अधिकारी
( आयुक्तांचे कार्यालय )

C:\My Documents\MOM\Circular.doc